# साहिर लुधियानवी - भाग २



दरम्यानच्या काळात साहिर यांना अनिल विश्वास यांच्या 'दो राहा'मध्ये संधी मिळवून देण्यात अनिल धवन यशस्वी झाले आणि तेव्हा साहिरनी दिलेले 'मुहब्बत तर्क की मैने, गरेबा सी लिया मैने' हे गीत तलतने आपल्या गळ्याने अजरामर केले. परंतु हा चित्रपट तयार करण्यात बराच वेळ गेला आणि त्यामुळे उशीरा प्रदर्शित झाला. आता साहिरच्या प्रतिभेचा सर्वत्र बोलबाला झाला आणि याचा परिणाम म्हणून एस्. डी. बर्मन यांचे संगीत असलेले दोन मोठे चित्रपट त्यांना मिळाले. त्यांपैकी 'बाजी' (नवकेतन - दिग्दर्शक गुरू दत्त) हा चित्रपट एप्रिल १९५१ मध्ये प्रदर्शित झाला तर 'नौजवान' हा नंतर दोन महिन्यांनी प्रदर्शित झाला. 'बाजी'ची सर्वच गाणी चांगली होती पण त्यांपैकी 'ये कौन आया की मेरी दिल की दुनिया मे' (गीता), 'तदबीर से बिगडी हुई तकदीर बनाले' (गीता), 'आज की रात पिया' (गीता), 'शरमाये काहे' (शमशाद) आणि 'मेरे लबों पे देखो आज भी तराने है' हे किशोरचे गाणे ही काही गाणी तर प्रचंड गाजली.

'नौजवान' ह्या चित्रपटातील 'थंडी हवाये लेहराके आये' हे लताचे लोकप्रिय झालेले अविस्मरणीय गाणे त्यांनीच लिहिले आहे. त्याच चित्रपटातील किशोर आणि शमशाद यांचे लोकांनी उचलून धरलेले एक खट्याळ द्वंद्वगीत 'पी पी पिया --- हम और तुम दोनो रहे एक साथ' हे त्यांचेच गाणे.

ह्या सर्व प्रचंड लोकप्रिय झालेल्या गाण्यांमुळे हिंदुस्थानातील घरादारांत त्यांचे नाव पोचले आणि त्या उत्साहामुळे त्यांचे गीतलेखनाचे काम अत्यंत आनंदाने आणि अव्याहतपणे दशकामागून दशके चालूच राहिले. 'प्यासा' चित्रपट त्यांचा अत्युच्च यशाचा बिंदू ठरला. त्यामध्ये त्यांनी खरेच अचंबित करणाऱ्या रचना केल्या. साहिरनी आपल्या असामान्य कल्पनाशक्तीचा सततच आविष्कार दाखवून दिला.

साहिर यांची लिहिण्याची पध्दत सोपी आणि स्पष्ट होती आणि त्यातील शब्द तुमच्या जाणीवांना आणि हृदयाला स्पर्शून जाणारे असत. दिलेल्या चालीवर त्यांनी गीत कधीच लिहून दिले नाही. इतर गीतकार दिलेली चाल किंवा मीटर मध्ये शब्द बसवून गीत तयार करून देत असतीलही, परंतु साहिरना मात्र त्यामधून प्रेरणा मिळत नसे आणि तसे करणे जमतही नसे. एस्. डी. बर्मन यांच्या ते पथ्यावरच पडले म्हणायला हरकत नाही. त्यांना हिंदी/उर्दू अगदी थोडंच कळत असे. नाहीच असं म्हणायला हरकत नाही. परंतु दैवाची काय कमाल आहे पहा ! तेव्हाचा एकामागून एक चित्रपट एस्. डी. बर्मन यांचे संगीत आणि साहिर यांची भावपूर्ण गीते यांनी नटलेला होता. ('मुनीमजी', 'जाल', 'बाझी', 'फंटूश', 'टॅक्सी ड्रायव्हर', 'देवदास', प्यासा', इ. इ.) साहिर निर्मात्यांना सांगत असत की मला चित्रपटाची गोष्ट आणि त्यातल्या कोणत्या दृश्यासाठी गाणे पाहिजे ते सांगा आणि थोडे थांबा. घाई करू नका. योग्य वेळ आली की जादूगार पोतडीतून वस्तू बाहेर काढतो तशी सुरेख गीते मी तुम्हाला देतो.

ज्यांना साहिरच्या गीतांचा सखोल अभ्यास करावयाचा असेल त्यांच्यासाठी 'गाता जाये बंजारा' हा त्यांचा चित्रपटगीतांचा संग्रह उपलब्ध आहे. तसेच 'परछाईयाँ' हा त्यांचा युध्द विरोधक प्रबंध त्यांतील जाण आणि अभिव्यक्ती यांचा अभ्यास करण्यास उपयुक्त ठरावा.

पटकथा लेखक आणि गीतकार गुलजार यांचे साहिरबद्दलचे मत पाहूया - 'साहिर हा एकमेव गीतकार असा होता की तो केवळ चित्रपट माध्यमांमध्ये काम करण्यासाठी आला नव्हता, तर चित्रपट माध्यमाने त्याला आपल्याकडे खेचून आणले.' ह्यावरून असे दिसते की साहिर हे सदाच स्वमग्न माणूस होते. त्यांनी कधीच लग्नदेखील केले नाही.

त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरच्या काळातही, सभोवती माणसांची वर्दळ असतानाही ते एकाकीच राहिले. 'दिन ढल जाये' पध्दतीचा माणूस ! समोर व्हिस्कीचा ग्लास असला की पुरे !
सुरेख आणि रुबाबदार कपड्यांत ते नेहमीच आकर्षक वाटत. आपल्याला नकार देणाऱ्या त्या मुलीला ते कधीच विसरू शकले नाहीत. असे वाटते की त्यांच्या उत्तमोत्तम गीतरचनांसाठी ते अव्हेरलेले प्रेमच प्रेरणास्थान ठरले की काय ? कारण 'सोने की चिडियाँ' चित्रपटाची तयारी सुरू होण्यापूर्वीच त्यांनी

तिच्यावर लिहिलेले पुढील गीत प्रसिध्द झाले होते -

मेरे ख्वाबों के झरोखों को सजाने वाली
तेरे ख्वाबों में कही मेरा गुजर है कि नहीं ?
पूँछकर अपनी निगाहों से, बता दे मुझको
मेरी रातो के मुकद्दर मे सहर है कि नहीं ?

प्यार पर बस तो नहीं है मेरा, लेकिन फिर भी
तू बता दे की तुझे प्यार करू या न करू?
तुने खुद अपने तबस्सुम से जगाया है जिन्हें
उन तमन्नाओ का इजहार करू या न करू ?

तसेच 'कभी कभी' ह्या चित्रपटातील ह्या गीतातून तिच्याशीच कवी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत होता का ?

मगर ये हो न सका और अब ये आलम है
के तू नहीं, तेरा ग़म, तेरी जुस्तजू भी नहीं
गुज़र रही है कुछ इस तरह ज़िन्दगी जैसे
इसे किसी के सहारे की आरज़ू भी नहीं

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com